# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग
## प्रसिध्दीपत्रक माहे फेब्रुवारी - २०२१

**क्र. क - ५ / प्रसिद्धीपत्रक / ०२ / २०२१** **दिनांक :- २६ / ०३ / २०२१**

| १.नेमणूक/ सेवासमाप्ती | २.पदोन्नती/ पदावनती | ३.सेवानिवृत्ती/ स्वेच्छासेवानिवृत्ती | ४.बदली | ५.बक्षिस | ६.शिक्षा | ७.निधन | ८.संकिर्ण |
|---|---|---|---|---|---|---|---|

**१. नेमणूक / सेवासमाप्ती :- निरंक**

**२. पदोन्नती / पदावनती :- निरंक**

**३. सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :-** श्री. शिवाजी वैजिनाथ आलुरे, पोलीस उप-अधिक्षक (अभि)बि.सं. नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना दि. २८/०२/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचेकडील पोलीस उप-अधिक्षक (अभि) बि.सं. नांदेड परिक्षेत्र नांदेड या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. गणपतसिंग ठाकुर, पोलीस निरीक्षक बि.सं.(अभि) रा.रा.पो.बल गट क्र.१२ हिंगोली यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत देण्याबाबत या कार्यालयाचा आदेश क्र. आस्था-१/प्रलि/पोउपअधि/निसेनि/२०२१/७०५ दि. १८.०२.२०२१ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशात बदल करुन पोलीस उपअधिक्षक (अभि) बि.सं. नांदेड परिक्षेत्र, नांदेड या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.एस.एस.चांदखेडे, उपअधिक्षक (अभि) बि.सं.औरंगाबाद यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/प्रलि/पोउपअधी/निसेनि/२०२१/७८२ दि.२६/०२/२०२१)**

**४. बदली :- निरंक**

**५. बक्षिसः- निरंक**

**६. शिक्षा :-**

**१. विषय : <u>विभागीय चौकशीबाबत...(अंतिम आदेश)</u>**
**अपचारी मपोहवा बियंचा क्र.१९८/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक बिनतारी संदेश विभाग, मुंबई.**

**<u>थोडक्यात हकीकत</u> :**

२/- अपचारी मपोहवा बियंचा क्र.१९८/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक-बिनतारी संदेश विभाग, मुंबई या दि.३१.०५.२०१७ ते ०६.०३.२०१९ पर्यंत ६४५ दिवस कर्तव्यावर अनधिकृतपणे विनापरवाना गैरहजर राहील्याचे कसुरीबाबत त्यांचेविरुध्द पोलीस उप आयुक्त, बिनतारी संदेश विभाग, मुंबई यांनी आदेश जा.क्र. ३०/पोउआ/बिसंवि/ई-४/२०१९, दिनांक ०६.०५.२०१९ अन्वये विभागीय चौकशी आदेशित केली होती व चौकशी अधिकारी म्हणून सहा.पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश, (मुख्यालय) मुंबई यांची नेमणूक केली होती. नमूद चौकशी अधिकारी यांनी सदर विभागीय चौकशीचा अहवाल दि.१३.११.२०१९ अन्वये पोलीस उप आयुक्त, बि.सं.वि.मुंबई यांना सादर केला होता. तथापि प्रस्तुत प्रकरणी अपचारी यांना गंभीर शिक्षा द्यायची असल्याने मूळ विभागीय चौकशी प्रकरण संदर्भ क्र.१ अन्वये या कार्यालयास सादर केले होते. परंतू सदर

विभागीय चौकशीमध्ये त्रुटी असल्याने त्रुटींची पूर्तता करणेकामी मूळ प्रकरण दि.०७.०४.२०२० अन्वये त्यांचेकडे परत पाठविले असता त्रुटींची पूर्तता करुन संदर्भ क्र.२ अन्वये त्यांनी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

३/- सदर विभागीय चौकशीमध्ये अपचारी मपोहवा बियंचा १९८/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक-बिनतारी संदेश विभाग, मुंबई यांचेविरुध्द **खालीलप्रमाणे दोषारोप** ठेवण्यात आलेले आहेत.

१) अपचारी या दि.३१.५.२०१७ रोजी पासून प्रदिर्घकाळ रुग्णनिवेदन करुन कर्तव्यावर गैरहजर आहेत. त्यांना पोलीस दळणवळण संकुल येथुन कर्तव्यावर हजर होण्यासाठी वारंवार ज्ञापन पाठवून व दुरध्वनीद्वारे संदेश देऊनही कर्तव्यावर हजर राहील्या नाहीत.
२) अपचारी या विहित कार्यपध्दती न अवलंबता दि.३१.५.२०१७ पासून अद्यापपर्यंत दिर्घ कालावधीसाठी विनापरवाना गैरहजर राहील्या.
३) प्रदीर्घ विनापरवाना गैरहजर कालावधीमध्ये अपचारी यांनी सलग एका विशिष्ट आजाराकरीता रुग्णनिवेदन केलेले नाही. तसेच अपचारी सलग आजारी नसताना देखील कर्तव्यावर गैरहजर राहीलेल्या आहेत. यावरुन त्यांना शासकीय नोकरीच्या प्रती स्वारस्य नसल्याचे दिसून येते.

## ६. अपर पोलीस महासंचालक व संचालक, पो.बि.सं.म.राज्य यांचे समाकलन :

सदर विभागीय चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता, अपचारी मपोहवा क्र.१९८ बियंचा/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक - बि.सं.वि. मुंबई या दि.३१.५.२०१७ ते ६.३.२०१९ या कालावधीत प्रसुती

झाल्याने तसेच अपचारी या स्वत: देखील वेळोवेळी विविध आजाराने ग्रस्त असल्याने नमूद कालावधीत कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे. तथापि त्यांना नियमानुसार प्रसुती रजा देय असताना रजेची मागणी का केली नाही? याबाबत विचारणा केली असता, अपचारी यांना गरोदरपणात होत असलेल्या त्रासामुळे रुग्णालयात उपचार घेत असल्याने प्रसुती रजा घेण्याचे ध्यानातून निघून गेले असल्याचे, तसेच त्यांना तीन अपत्य असून त्यापैकी १ अपत्य त्या सेवेत दाखल होण्यापूर्वीचे व २ अपत्य सेवेत दाखल झाल्यानंतरची असल्याचे दि.१५.६.२०२० अन्वये सादर केले आहे. तथापि अपचारी यांना कर्तव्यावर हजर होणेबाबत पोलीस उप आयुक्त, बि.सं.वि मुंबई यांनी वेळोवेळी कळविले असताना त्या कर्तव्यावर हजर झाल्या नाहीत. तसेच औषधोपचाराची कागदपत्रे देखील सादर केलेली नाहीत. अपचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीमध्ये ठेवण्यात आलेले तीन दोषारोपांपैकी दोषारोप क्र.१ व २ पूर्णपणे सिध्द होत असल्याचे व दोषारोप क्र.३ अंशत: सिध्द होत असल्याबाबत चौकशी अधिकारी यांनी दिलेले निष्कर्षाशी मी सहमत आहे.

अशाप्रकारे अपचारी मपोहवा बियंचा क्र.१९८/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक - बि.सं.वि. मुंबई या दि.३१.०५.२०१७ ते ०६.०३.२०१९ पर्यंत ६४५ दिवस जाणीवपूर्वक प्रदीर्घकाळ कर्तव्यावर गैरहजर राहून त्यांनी त्यांचे कायदेशीर कर्तव्यामध्ये अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार व निष्काळजीपणा केला असल्याचे स्पष्ट झाल्याने सदर गंभीर कसुरीसाठी त्यांना **"पुढील देय वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने तीन वर्षासाठी वेतनवाढ रोखणे" या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.**

७/- उपरोक्त कारणे दाखवा नोटीसला अपचारी मपोहवा बियंचा क्र.१९८/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक-बि.सं.वि., मुंबई यांनी मुदतीत सादर केलेला दि.११.१२.२०२० रोजीचा खुलासा पोलीस उप आयुक्त, बि.सं.वि., मुंबई यांनी जा.क्र. पोउआ/बिसंवि/ई-४/९१/२०२०, दि.१८.१२.२०२० अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे. तसेच प्रस्तावित शिक्षेबाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्वानुसार म्हणणे सादर

करणेकामी त्यांचा दि.०८.०२.२०२१ रोजी १०.३० वा. व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आज्ञांकित कक्ष घेण्यात आला. आज्ञांकित कक्षामध्ये व खुलाशामध्ये त्यांनी रक्तदाब, हर्निया व आजार असल्याने व मुलगा लहान असल्याने कर्तव्यास उपस्थित राहू शकले नसलेबाबत व त्याबाबत कार्यालयास वेळोवेळी कागदपत्रे सादर केली असल्याचे नमूद केले आहे. तसेच सध्या लॉकडाऊनमुळे पतीची नोकरीसुध्दा सुटल्याने मासिक / शैक्षणिक खर्च भागविणे जिकीरीचे होत असल्याने शिक्षा माफ होण्यास विनंती केली आहे.

८/- एकंदर अपचारी मपोहवा बियंचा क्र.१९८/प्रेरण प्रशांत चव्हाण, नेम.बिसंवि मुंबई यांनी खुलाशासोबत व

आज्ञांकित कक्षावेळी प्रस्तावित शिक्षेबाबत बचावाचे दृष्टीने नव्याने कोणतीही ठोस मुद्दे / कागदपत्रे सादर केलेली नसल्याने त्यांचा खुलासा संयुक्तिक नाही. त्यामुळे अपचारी यांना प्रस्तावित केलेल्या शिक्षेबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**अंतिम आदेश :**

९/- मी, रितेश कुमार, अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २५ व २६ आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन **अपचारी मपोहवा क्र.१९८ बियंचा/प्रेरणा प्रशांत चव्हाण, नेमणूक - बिनतारी संदेश विभाग, मुंबई यांना उपरोक्त गंभीर कसुरीबद्दल "पुढील देय वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने तीन वर्षासाठी वेतनवाढ रोखणे" ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.**

सदर शिक्षेने तुम्ही व्यथित झाले असल्यास व त्याविरुध्द अपील करण्याची इच्छा असल्यास हे आदेश प्राप्त झाल्या दिनांकापासून **६० (साठ) दिवसांचे आत या कार्यालयाचे मार्फत अपिलीय प्राधिकारी तथा मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अपील अर्ज करु शकता**. अपील अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

--o--

**२.** पो.हवा./ बियंचा पी.के. राजपुत नेमणुक बि.सं. विभाग नागपुर नाशिक शहर दिनांक ०४/०७/२०१९ रोजी संदेश तपासणी कार्यवाही अंतर्गत संदेश क्र. ९८ ची प्रक्षेपित मुळ प्रत संदेशाशी पडताळणी केली नाही. परिणामी पाळी यंत्रचालक पोहवा/बियंचा के.के.कोल्हे यांचेकडुन झालेली चुक निदर्शनास आली नाही व संदेश शेवटपर्यंत चुकीचा प्रक्षेपित झाला तरी आपण बिनतारी कार्यप्रणालीचे उल्लंघन करुन निष्काळजीपणा व बेजबाबदार कर्तव्य बजावल्याचे स्पष्ट होत असुन प्रकरणी दोषी आढळुन येत आहात.

**आदेश :-** मी ईश्वर दा. कांबळे, पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे वर नमुद केलेल्या कसुरीमुळे पोहवा /बियंचा पी.के. राजपुत नेमणुक बि.सं. विभाग नाशिक शहर यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग - ४ नियम क्र. ४३८ मधील पोटनियम क्र.रोमन ५ (अे) (३) तसेच मा. संचालक पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र. क .सी/३/३४९/मतका/१९९३ दिनांक ६/०१/१९९४ मधील तरतुदीनुसार **''सक्त ताकीद'** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**(पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे यांचे आदेश क्र. पशा/प्रली/सक्त ताकीद/पोहवा राजपुत/३७४/ २०२१, दि.१७/०२/२०२१)**

--o--

**३.** पोहवा / बियंचा के.के.कोल्हे नेमणुक नाशिक ग्रामीण प्रतिनियुक्ती नाशिक शहर दिनांक ०३/०७/२०१९ रोजी नाशिक शहर व्हि -सॅट स्थानक येथे दुपारपाळी यंत्रचालक म्हणुन टंकलिखित केलेला व प्रक्षेपणास प्रलंबित दिलेला संदेश क्र. ९८ हा मुळ संदेशाशी पडताळणी करुन प्रक्षेपित केला नाही. त्यामुळे प्राप्तकर्त्यास मुळ संदेश शेवट पर्यंत

प्राप्त झालेला नाही तरी आपण बिनतारी कार्यप्रणालीचे उल्लघंन करुन निष्काळजीपणा व बेजबाबदार कर्तव्य बजावल्याचे स्पष्ट होत असुन प्रकरणी दोषी आढळुन येत आहात.

**आदेश** :- मी ईश्वर दा .कांबळे पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे वर नमुद केलेल्या कसुरीमुळे पोहवा/बियंचा के.के.कोल्हे नेमणुक नाशिक ग्रामीण यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ नियम क्र. ४३८ मधील पोटनियम क्र . रोमन ५ (अे) (३) तसेच मा. संचालक पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र. क .सी/३/३४९/मतका/१९९३ दिनांक ६/१/१९९४ मधील तरतुदीनुसार **''सक्त ताकीद'** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**(पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे यांचे आदेश क्र. पशा/प्रली/सक्त ताकीद/पोहवा कोल्हे/३२३/२०२१, दि.१७/०२/२०२१)**

**७. निधन**:- श्री. शाकीर उस्मान शेख, पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस )नेमणुक बिनतारी संदेश विभाग, पुणे शहर यांचे दिनांक ०२/०२/२०२१ रोजी निधन झाल्याने, त्यांचे नांव बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखातुन दिनांक ०३/०२/२०२१ पासुन कमी करण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-२/मृत्यू/पोशि (कर्मशाळा मदतनीस) शेख /२०२१/५४४ दि.१०/०२/२०२१)**

**८. संकीर्ण :- निरंक**

दिनांक२६/०३/२०२१

**( श्रीमती स्मार्तना पाटील )**
**पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय